दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | सोमवार, 13 जुलै 2026 | अंक क्र. 69 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com






# बीड पोलिसांच देशात नाव
## गुन्हे तपासात देशात पहिल्यांदाच कृत्रिम
# बुद्धिमत्तेचा (AI) वापर

- 'DeepEye AI' प्रकल्पाची राज्यस्तरीय पाहणी यशस्वी
- ३ ते ४ तासांची FIR प्रक्रिया आता अवघ्या ३ ते ४ मिनिटांत होणार पूर्ण.
- FIR ते थेट कोर्ट ट्रायलपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर.
- CCTV फुटेज आणि CDR विश्लेषणाचे कामही AI करणार.

**बीड : ( नितीन ढाकणे विशेष वृत्तांकन )**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या तपास प्रक्रियेला अधिक वेगवान, अचूक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी बीड पोलीस दलाने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. बीड पोलिसांनी विकसित केलेल्या "DeepEye AI" या देशातील पहिल्याच End-to-End AI आधारित 'पोलिसिंग आणि इन्व्हेस्टिगेशन सपोर्ट सिस्टम'ची राज्यस्तरीय तांत्रिक व तपासविषयक Proof of Concept (PoC) पाहणी बीड शहर पोलीस ठाण्यात यशस्वीरित्या पार पडली. या यशस्वी चाचणीमुळे आता संपूर्ण महाराष्ट्र पोलीस दलात हा प्रकल्प राबवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


### काय आहे 'DeepEye AI' प्रकल्प ?

DeepEye AI हा देशातील अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प आहे जो गुन्हा घडल्यापासून ते थेट न्यायालयातील खटल्याच्या निकालापर्यंत (Trial Monitoring) तपासी अधिकाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे (AI) सहाय्य पुरवतो. यामध्ये तक्रार नोंदणी, FIR, पुरावा व्यवस्थापन, आरोपपत्र (Charge Sheet) सादरीकरण आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपासाचे थेट डिजिटल निरीक्षण अशा सर्व बाबींचा समावेश आहे. बीड पोलिसांनी २०१७ पासूनचे सर्व FIR आणि ८०० हून अधिक चार्जशीट्स या प्रणालीच्या 'नॉलेज बेस'मध्ये समाविष्ट केल्या आहेत.

### ३ ते ४ तासांचे काम ३ ते ४ मिनिटांत!

पारंपरिक पद्धतीने गुंतागुंतीच्या गुन्ह्याची FIR नोंदवण्यासाठी पोलिसांना ३ ते ४ तास लागतात. मात्र, DeepEye AI च्या सहाय्याने हा मसुदा अवघ्या ३ ते ४ मिनिटांत तयार करण्याची क्षमता प्रत्यक्ष प्रात्यक्षिकात सिद्ध झाली. यामध्ये 'स्पीच-टू-टेक्स्ट' (बोलून तक्रार नोंदवणे), लाईव्ह व्हॉईस, ऑडिओ अपलोड आणि ई-मेलद्वारे प्राप्त माहितीचे AI विश्लेषण करून नवीन भारतीय न्याय संहिता (BNS/BNSS) नुसार योग्य कलमे लावण्याची सूचना ही प्रणाली स्वतः करते.

BEED POLICE
DEEPEYE



### पुराव्यांची सुरक्षा

- पुराव्यांची योग्य नोंद ठेवून 'Chain of Custody' राखण्यास मदत होते, ज्यामुळे कोर्टात पुरावे टिकून राहतील.
- या प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी आयआयटी कानपूर, सी-डॅक (C-DAC) पुणे आणि आयसर (IISER) पुणे येथील तांत्रिक तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्यात आली होती. ६५ वेगवेगळ्या 'टेस्ट केसेस'चे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर, तज्ज्ञ समितीने बीड पोलिसांच्या या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे विशेष कौतुक केले. ही प्रणाली आधुनिक पोलीसिंगमध्ये देशासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि तांत्रिक क्षमता

- तपासाची दिशा ठरवणे , गुन्ह्याच्या स्वरूपानुसार आवश्यक पुरावे, पंचनामे आणि करायचा पत्रव्यवहार याबद्दल प्रणाली तपासी अधिकाऱ्याला मार्गदर्शन (Investigation Path Suggestion) करते, CCTV व CDR चे जलद विश्लेषण, तासनतास CCTV फुटेज पाहण्याऐवजी AI फुटेजमधील संशयित व्यक्ती, वाहने आणि हालचालींची ओळख (Face & Vehicle Recognition) पटवून देते. तसेच संशयितांच्या कॉल रेकॉर्ड्सचे (CDR) विश्लेषण करते, गुन्हेगारांचा पूर्वइतिहासः वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींचा डेटा गोळा करून MPDA किंवा मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाईसाठी संभाव्य टोळ्यांची माहिती प्रणाली थेट हायलाईट करते.



# मतदार यादीतील अस्तित्वासाठी सध्याचे 'मॅपिंग' अनिवार्य; "गणना प्रपत्र" भरणे अत्यंत आवश्यक !

**'SIR' प्रक्रियेत निष्काळजीपणा केल्यास शासकीय सवलतींवर पाणी सोडावे लागेल; परळी नगर परिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती अंजलीताई माळी यांचा इशारा**

### नागरिकांनी कोणतीही चालढकल न करता, आपल्या कुटुंबाचे मॅपिंग तात्काळ पूर्ण करून घ्यावे

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**



निवडणूक आयोगाच्या वतीने सध्या सुरू असलेली 'एसआयआर' (विशेष सखोल पुनरिक्षण) मोहीम ही प्राथमिक नसून, निवडणूक आयोगाची मुख्य आणि अंतिम मॅपिंग प्रक्रिया आहे. यापूर्वी प्रशासनाने केलेले मॅपिंग हे केवळ 'ONLINE PREE SIR' अंतर्गत २००२ आणि २०२४ च्या मतदार यादीतील नावांची प्राथमिक जुळवणी करण्यासाठी होते. त्यामुळे नागरिकांनी सध्या सुरू असलेल्या मुख्य मॅपिंगला अजिबात हलक्यात घेऊ नये. ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास केवळ शासकीय योजनांचाच लाभ बंद होणार नाही, तर लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार म्हणजेच 'मतदानाचा हक्क'ही कायमचा हिरावला जाऊ शकतो, अशी गंभीर जाणीव परळी नगरपरिषदेच्या महिला व बाल कल्याण सभापती तथा भाजपा नेत्या अंजलीताई माळी यांनी करून दिली आहे.

प्रत्येक वार्डातील नागरिकांनी आपापल्या बीएलओला भेटून ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे जाहीर आवाहन त्यांनी केले आहे. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूच नेनुसार भाजपची यंत्रणा सक्रिय राष्ट्रीय महत्त्वाच्या असलेल्या या मोहिमेची गंभीरता ओळखून, राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या थेट सूचनेनुसार परळी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मैदानात उतरले आहेत. सध्या संपूर्ण परळी मतदारसंघात शासकीय बीएलओ (BLO) आणि भाजपचे बीएलए-२ (BLA-2) घरोघरी जाऊन मतदारांचे पुनरावलोकन (मॅपिंग) करत आहेत.

नागरिकांनी आपल्या दारात येणाऱ्या या प्रतिनिधींना सहकार्य करून स्वतःसह आपल्या संपूर्ण कुटुंबाचे "गणना प्रपत्र" अचूक भरून देणे आवश्यक आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व विविध सामाजिक उपक्रम राबविण्याबाबत बैठक संपन्न..

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, समाजोपयोगी अभियान, आरोग्य शिबिर, गरजूंना मदत, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, विविध सामाजिक उपक्रमांच्या आयोजनाबाबत नियोजन बैठक उत्साहात पार पडली.

बैठकीत वाढदिवस साधेपणाने व समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविणे, गरजू नागरिकांना मदत करणे तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम आयोजित करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्येक उपक्रमाचे नियोजन,



जबाबदाऱ्या आणि नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्याबाबत सूचना मांडल्या. वाढदिवसानिमित्त समाजहिताचे उपक्रम राबवून ना. पंकजाताई मुंडे यांच्या पर्यावरण संवर्धन व सामाजिक कार्याच्या विचारांना अधिक बळ देण्याचा संकल्प सर्वांनी व्यक्त केला.

बैठकीस भाजपच्या ज्येष्ठ नेते डॉ. सौ. शालिनीताई कराड, भाजपा उपाध्यक्ष महादेव इटके, प्रशांत कराड, , वैजनाथ रेकणे, शेख अनिस, नितीन समशेट्टे, जिल्हा कोषाध्यक्ष पवन मोदानी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, राहुल केंद्रे, ॲड. प्रणव मराठे, वैद्यनाथ बँकेचे संचालक कुलभूषण जैन, महिला आघाडीचे अध्यक्ष श्रीमती सुचिता पोखरकर, अल्पसंख्याक आघाडीचे अध्यक्ष शेख शमी, युवा मोर्चा अध्यक्ष सुशील हरंगुळे, परळी कोषाध्यक्ष अनिश अग्रवाल, ज्ञानोबा सुरवसे, भाजपा ओबीसी अध्यक्ष विजय दहिवाळ, भाजपा शहर चिटणीस जितेंद्र मस्के, विकास हालगे, राजकुमार कौलवार, बंडू नाना कोरे, राम तोष्णीवाल, शशिकांत मुंडे, अच्युत जोगदंड सर, गोविंद चौरे, योगेश पांडकर, उमेश निळे, दिलीप नेहरकर, पवन तोडकरी, खालेद राज, नारायण गर्जे, शेख खदिर, सय्यद सईद भाई, बंडू आघाव सर, विराज गीते, कृष्णा बेदरकर, रेहाना भाभी आदी कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# संपादकीय

## पांडुरंगाच्या दर्शनाचा ध्यास

'ज्ञानोबा-तुकाराम', 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल', 'राम कृष्ण हरी' या नामघोषाने दुमदुमणारे महाराष्ट्राचे रस्ते, टाळ-मृदंगाचा गजर, भगव्या पताकांनी सजलेला वारकऱ्यांचा महासागर आणि पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करणारे लाखो भाविक, हे चित्र म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जिवंत प्रतीक असलेली पंढरीची वारी होय. ही वारी केवळ धार्मिक यात्रा नसून श्रद्धा, समता, भक्ती, सामाजिक ऐक्य आणि मानवी मूल्यांचा अखंड उत्सव आहे.

आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीहून, तर संत तुकाराम महाराजांची पालखी देहूहून निघते. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील विविध भागांतून अनेक संतांच्या पालख्या, दिंड्या आणि लाखो वारकरी सहभागी होतात. पायी चालत, मुखी विठ्ठलाचे नामस्मरण करत, अभंग गात आणि एकमेकांना साथ देत वारकरी अनेक दिवसांचा प्रवास पूर्ण करतात. या प्रवासात त्यांना थकवा जाणवत नाही, कारण त्यांच्या मनात 'पांडुरंगाचे दर्शन' हा एकच ध्यास असतो. पंढरीच्या वारीचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम यांसारख्या संतांनी वारकरी संप्रदायाला नवी दिशा दिली. त्यांनी समाजाला भक्तीचा, समतेचा आणि मानवतेचा संदेश दिला. जात-पात, श्रीमंती-गरिबी, उच्च-नीच या भेदांपलीकडे जाऊन प्रत्येक माणूस विठ्ठलाचा भक्त आहे, ही शिकवण संतांनी दिली. त्यामुळे वारी ही केवळ देवदर्शनाची यात्रा राहिली नाही, तर समाजप्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम बनली.

वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यामधील समता. वारीमध्ये कोण मोठा आणि कोण लहान असा भेद नसतो. शेतकरी, कामगार, शिक्षक, डॉक्टर, अधिकारी, व्यापारी, विद्यार्थी, महिला, वृद्ध, युवक हे सर्वजण एकाच रांगेत चालतात. सर्वांच्या ओठांवर विठ्ठलाचे नाव आणि मनात भक्तिभाव असतो. एकमेकांना मदत करणे, सेवा करणे, शिस्त पाळणे आणि सामूहिक जीवन जगणे, ही वारीची संस्कृती आहे. म्हणूनच वारीला 'चालते-बोलते विद्यापीठ' असेही म्हटले जाते. विठ्ठलाला 'गरिबांचा देव' असे संबोधले जाते. कारण विठ्ठलाकडे जाण्यासाठी संपत्तीची गरज नसते; गरज असते ती निस्सीम भक्तीची. विटेवर उभा असलेला, कटीवर हात ठेवलेला पांडुरंग आपल्या प्रत्येक भक्ताची समान भावनेने वाट पाहत असतो. भक्ताच्या मनातील प्रेम आणि श्रद्धाच त्याच्यासाठी सर्वात मोठा नैवेद्य असतो. त्यामुळे श्रीमंत असो किंवा गरीब, प्रत्येक वारकऱ्याला विठ्ठल आपलाच वाटतो. हीच भावना लाखो लोकांना दरवर्षी पंढरीकडे खेचून आणते.

एकेकाळी आधुनिकतेमुळे, बदलत्या जीवनशैलीमुळे आणि धावपळीच्या युगामुळे वारीमध्ये सहभागी होणाऱ्यांची संख्या कमी होईल, अशी भीती व्यक्त केली जात होती; परंतु वास्तव मात्र याच्या अगदी उलट आहे. दरवर्षी वारीत सहभागी होणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे. आज तरुण पिढीही मोठ्या उत्साहाने वारीत सहभागी होताना दिसते. माहिती तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि आधुनिक सुविधा उपलब्ध असूनही लाखो युवक पायी चालत वारी करण्याचा संकल्प करतात. हे वारीच्या आध्यात्मिक सामर्थ्याचे आणि विठ्ठलभक्तीच्या प्रभावाचे जिवंत उदाहरण आहे.

वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही, तर सामाजिक ऐक्याचा एक आदर्श नमुना आहे. वारीच्या मार्गावर अनेक गावांतील नागरिक वारकऱ्यांसाठी अन्नदान, पाणी, वैद्यकीय सेवा आणि निवासाची व्यवस्था करतात. सेवा हीच खरी पूजा या भावनेतून हजारो स्वयंसेवक वारकऱ्यांची सेवा करतात. या प्रवासात कोणाचाही धर्म, जात, भाषा किंवा आर्थिक स्थिती महत्त्वाची नसते; महत्त्वाची असते ती केवळ मानवता आणि भक्ती. वारीने महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक समृद्ध केली आहे. अभंग, भारूड, कीर्तन, प्रवचन, भजन यांसारख्या लोकपरंपरांना वारीमुळे नवे जीवन मिळाले आहे. संत साहित्याचा वारसा आजही वारकऱ्यांच्या मुखातून जिवंत राहिला आहे. संत तुकारामांचे अभंग आणि संत ज्ञानेश्वरांची ओवी आजही लाखो लोकांना जीवन जगण्याची प्रेरणा देतात. पंढरीची वारी आपल्याला संयम, शिस्त, सहकार्य, सेवा, समता आणि भक्ती यांचे धडे शिकवते. शेकडो किलोमीटरचा कठीण प्रवास करतानाही वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसतो. कारण त्यांना विश्वास असतो की प्रत्येक पाऊल त्यांना विठ्ठलाच्या अधिक जवळ घेऊन जात आहे. हा प्रवास केवळ पायांचा नसतो, तर मनाच्या शुद्धीकरणाचा आणि आत्मिक उन्नतीचाही असतो.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि स्पर्धात्मक युगातही पंढरीची वारी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे, अध्यात्माचे आणि सामाजिक ऐक्याचे सर्वात मोठे प्रतीक म्हणून उभी आहे. शेकडो वर्षांची ही परंपरा आजही लाखो लोकांच्या श्रद्धेने जिवंत आहे आणि पुढील अनेक पिढ्यांपर्यंत ती अशीच अविरत सुरू राहील, यात शंका नाही. पंढरीची वारी म्हणजे केवळ पंढरपूरकडे जाणारी यात्रा नाही; ती माणसाला माणसाशी जोडणारी, भक्ताला देवाशी जोडणारी आणि समाजाला समतेचा संदेश देणारी एक महान सांस्कृतिक चळवळ आहे. विठ्ठलाच्या नामस्मरणातून जीवनाला नवी दिशा देणारी ही परंपरा महाराष्ट्राचे वैभव असून, ती आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. 'ज्ञानोबा-तुकाराम'चा अखंड जयघोष आणि 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'चा गजर जोपर्यंत महाराष्ट्रात घुमत राहील, तोपर्यंत पंढरीची वारीही श्रद्धेचा अखंड प्रवाह म्हणून अविरत वाहत राहील. जोपर्यत वारीमध्ये वारकऱ्यांचा सहभाग वाढता आहे.

# लोकार्थ


## SBI फंड्स मॅनेजमेंटचा आयपीओ मंगळवारी खुला होणार

SBI फंड्स मॅनेजमेंटने आपल्या पहिल्यावहिल्या प्रारंभिक जाहीर भाग विक्रीसाठी (आयपीओ) प्रत्येकी १ दर्शनी मूल्य असलेल्या प्रति इक्विटी शेअरचा किंमतपट्टा) z४५ ते ५७४ निश्चित केला आहे.कंपनीचा हा आयपीओ किंवा "ऑफर") वर्गणीसाठी मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी खुला होईल आणि गुरुवार, १६जुलै २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर २६इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ म्हणजे प्रत्येकी दर्शनी मूल्य असलेल्या तब्बल २०३,७०९,२३९ इक्विटी शेअर्सची 'ऑफर-फॉर-सेल' आहे.अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली/ऑफर सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी खुली आणि बंद होईल.मूळची १९९२ मध्ये स्थापना झालेली ही कंपनी, ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या १२,५०९.९८अब्ज त्रैमासिक सरासरी व्यवस्थापना खालील मालमत्ता आणि १५.३% म्युच्युअल फंड मार्केट शेअरसह, च्या दृष्टीने भारतातील सर्वात मोठी मालमत्ता व्यवस्थापन कंपनी आहे. ही कंपनी ४,०५५.२६अब्ज पॅसिव्ह सह भारतातील सर्वात मोठी पॅसिव्ह मालमत्ता व्यवस्थापक देखीलआहे, ज्याचा मार्च३१, २०२६ पर्यंत बाजारातील हिस्सा२७.९% आहे.




## मिलवर्क्स टेक्नॉलॉजीजचा आयपीओ १४ जुलैपासून खुला

उच्च-अचूकतेचे यंत्र प्रक्रिया केलेले घटक, शीट मेटलपार्ट्स, सब-असेंब्लीज आणि इंटिग्रेटेड असेंब्लीज यांच्या उत्पादनात कार्यरत मिलवर्क्स टेक्नॉलॉजीज लिमिटेडने आपली इनिशियल पब्लिकऑफरिंग (आयपीओ) मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी खुली करण्याची घोषणा केली आहे. कंपनीचे वरच्या किंमत पट्ट्यानुसार १६०.३३ कोटी उभारण्याचे उद्दिष्ट असून, कंपनीचे समभाग बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होणार आहेत. या इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) अंतर्गत प्रत्येकी १० दर्शनी मूल्याचे ४८,४४,००० इक्विटी शेअर्स जारी करण्यात येणार असून, प्रति शेअर किंमतपट्टा ३१५ ते ३३१ निश्चित करण्यात आला आहे. आयपीओ मधून उभारण्यात येणारा निधी संयंत्र व यंत्र सामग्री खरेदीसाठी भांडवली खर्च, कार्यकारी भांडवलाच्या गरजा आणि सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरण्यात येणार आहे. या इश्यूसाठी अँकर गुंतवणूकदारांची बोली प्रक्रिया सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी होईल. आयपीओ मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होईल आणि गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी बंद होईल. या इश्यूचे बुकर निंगलीड मॅनेजर जीवायआर कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड असून, पूर्वाशेअ रजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड ही रजिस्ट्रार म्हणून कार्यरत आहे.




## अर्थ भारतचा गिफ्ट सिटीमध्ये पहिला सुवर्ण फंड लाँच

भारताच्या प्रमुख फायनान्शियल हबमधील अग्रगण्य फंड मॅनेजमेंट कंपनी अर्थ भारत इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स IFSC LLP ने 'अर्थ भारत FinMet फिजिकल गोल्ड फंड' लाँच केला आहे. हा गिफ्ट सिटीमधून सुरू झालेला पहिला फिजिकल कमॉडिटी फंड आणि पहिला गोल्ड फंड आहे. IFSCA ने जानेवारी 2026 पासून कमॉडिटी ट्रेडिंगला फायनान्शियल प्रॉडक्ट म्हणून मान्यता दिल्यानंतर हा फंड लाँच करण्यात आला आहे. या ऐतिहासिक लाँचमुळे गिफ्ट सिटी रेग्युलेटरने तयार केलेल्या सक्षम रेग्युलेटरी फ्रेमवर्कला नवा टप्पा मिळाला आहे.

"आम्ही इंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस अथॉरिटीचे आभारी आहोत की त्यांनी इंडस्ट्रीसोबत काम करून मजबूत रेग्युलेटरी फ्रेमवर्क तयार केले, ज्यामुळे इनोव्हेशनला प्रोत्साहन मिळेल आणि नवीन प्रॉडक्ट ऑफरिंगला चालना मिळेल. यामुळे गिफ्ट सिटी हा या प्रदेशातील प्रमुख IFSC म्हणून स्थापित होईल," असे अर्थ भारत इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स IFSC LLP चे मॅनेजिंग पार्टनर सचिन सावरीकर यांनी सांगितले.हा ओपन-एंडेड, पॅसिव्हली मॅनेज्ड फंड सिंगापूरस्थित प्रेशियस मेटल्स स्पेशालिस्ट FinMet सोबत भागीदारीत लाँच करण्यात आला आहे.

## नवनीतची 'जब बारी हो तुम्हारी, डायजेस्ट से करो तैयारी' मोहिम

:नवनीत एज्युकेशन लिमिटेडने आपल्या नवीन 'जब बारी हो तुम्हारी, डायजेस्ट से करो तैयारी' या मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेद्वारे कंपनीचे प्रमुख उत्पादन नवनीत डायजेस्ट हे परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वासार्ह अभ्यास साथी म्हणून सादर करण्यात आले आहे.ही मोहीम दर्शवते की नवनीत डायजेस्टआज ही विद्यार्थ्यांसाठी अभ्यास आणि उजळणी अधिक सोपी बनवते. यामध्ये सुव्यवस्थित अभ्यास सामग्री, प्रकरण निहाय सारांश, मेमरी मॅप्स, सराव प्रश्न तसेच परीक्षेच्या प्रभावी तयारीसाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून दिली जातात, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने उत्तम कामगिरी करता येते.हि नवी मोहीम एका साध्यापण अत्यंत समर्पक विचारावर आधारित आहे—प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात असा एक टप्पा येतो, जेव्हा त्याला स्वतःच्या बळावर एकाग्रतेने परीक्षेची तयारी करावी लागते. अशावेळी त्याला तात्काळ मार्गदर्शन करणारे कोणीही उपलब्ध नसते.हलक्या फुलक्या आणि आकर्षक कथनशैलीत सादर करण्यात आलेल्या या मोहिमेद्वारे नवनीत डायजेस्ट स्वतःला विद्यार्थ्यांचा कायमचा विश्वासू साथीदार म्हणून सादर करते. हे विद्यार्थ्यांना विचलित करणाऱ्या गोष्टी आणि संभ्रमयां पासून दू रठेवत, परीक्षा भिमुख स्पष्ट आणि अचूक उत्तरे त्यांना सर्वाधिक गरज असते,

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे



## उपवर्गीकरणाच्या विरोधात परळीत 10 ऑगस्ट रोजी महामोर्चा

### आनंदराज आंबेडकर करणार मार्गदर्शन

■ परळी/ प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या संदर्भात राज्यात अनुसूचित जाती मध्ये फुट पाडण्याचे षडयंत्र राज्य सरकार करीत आहे. अनुसुचित जातीतील 59 जातींना दिलेल्या या आरक्षणाला व ऐक्याला तडा जाऊ नये यासाठी एस्सीतील सर्वच जातींचा महामोर्चा दिनांक 10 ऑगस्ट रोजी परळीत आयोजित करण्यात आला आहे.या मोर्चास रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

परळी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात दिनांक 12 जुलै रोजी सकाळी 11 वाजता ही महत्वपूर्ण बैठक चर्मकार महासंघाचे प्रवक्ते रोहिदास बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.10 ऑगस्ट रोजी परळीत आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर, माजी मंत्री तथा चर्मकार महासंघाचे नेते बबनराव घोलप ,लहुजी क्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विकास पाथरीकर, सत्यशोधक समाज संघाचे लक्ष्मण शिंदे इत्यादीची उपस्थिती मोर्चास राहणार असल्याचे निशित करण्यात आले. या बैठकीत 1लाख 26 हजार 700 रुपये जमा झाले. तेच लवकरच कृती समिती जाहीर करण्यात येईल. महाराष्ट्रात अनुसूचित जाती मध्ये 59 जातींना अनुसूचित जाती मध्ये आरक्षणाचा लाभ मिळतो.

## महापालिका विकसित करणार 'एकात्मिक बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन पोर्टल'

### दिल्लीत यशस्वी प्रयोग करणाऱ्या संस्थेची निवड

■ मुंबई : वृत्तसंस्था

मुंबई शहरात वेगाने सुरू असलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प, रस्ते कॉंक्रीटीकरण, पुनर्विकास आणि शासकीय व खासगी बांधकामांमुळे निर्माण होणाऱ्या बांधकाम व पाडकाम कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा मुंबई महानगरपालिकेसमोरील मोठा पेच बनला आहे. या पार्श्वभूमीवर, अनधिकृतपणे डेब्रिज टाकणे आणि बेकायदेशीर वाहतुकीमुळे होणारे वायू व धूळ प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई महानगरपालिका 'एकात्मिक बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन पोर्टल' विकसित करणार आहे. यासाठी ट्रेस रिसोर्स मॅनेजमेंट प्रा. लि. या कंपनीची निवड करण्यात आली आहे.

### पोर्टलची प्रमुख वैशिष्ट्ये

- **जीपीएस आधारित ट्रॅकिंग: डेब्रिज वाहून नेणाऱ्या प्रत्येक वाहनावर डिजिटल लक्ष ठेवले जाईल.**
- **जिओ फेन्सिंग : कचरा वाहतूक करणाऱ्या गाड्या ठरवून दिलेल्या मार्गावरूनच जात आहेत की नाही, हे तपासले जाईल.**
- **ऑटो डीसीआर एकत्रीकरण: बांधकाम मंजुरी आणि कचरा व्यवस्थापन योजनेची सांगड घातली जाईल.**
- **पर्यावरण नियंत्रण: बेकायदेशीरपणे कचरा टाकण्यास अटकाव करून धूळ व वायू प्रदूषण कमी करण्यास मदत होईल.**

■ उच्च न्यायालय आणि मुख्य सचिवांचे निर्देश

बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०२५ आणि माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील वायू आणि धूळ प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. तसेच ८ मे २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही या कचऱ्याच्या संकलनापासून ते विल्हेवाटीपर्यंत डिजिटल देखरेख यंत्रणा उभारण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पालिकेने हे पाऊल उचलले आहे.

ऑटो डीसीआर आणि जीपीएस प्रणालीशी जोडणी हे पोर्टल केवळ माहिती संकलित करणार नसून ते मुंबई पालिकेच्या बांधकाम मंजुरी देणाऱ्या 'ऑटो डीसीआर' प्रणालीशी थेट जोडले जाईल. यामुळे कोणत्या बांधकामातून किती कचरा निघणार याचा अंदाज आधीच येईल. याशिवाय डेब्रिज वाहून नेणाऱ्या वाहनांवर 'जीपीएस व्हीटीएमएस' आधारित वाहन नियंत्रण यंत्रणा असेल. त्यामुळे कचरा ठरवून दिलेल्या अधिकृत डम्पिंग स्थळांवर न टाकता वाटेतच कुठेही बेकायदेशीरपणे ओतल्यास त्याची त्वरित माहिती नियंत्रण कक्षाला मिळेल.


यासाठी ट्रेस रिसोर्स मॅनेजमेंट प्रा. लि. ही एकच संस्था पात्र ठरली असून या संस्थेने यापूर्वी दिल्ली महानगरपालिकेसाठी 'दिल्ली मालबे' नावाचे अशाच प्रकारचे एकात्मिक पोर्टल यशस्वीरीत्या विकसित केले आहे. या साठी सुमारे १ कोटी ११ लाख रुपये इतका खर्च केला जाणार आहे. फक्त मे या संस्थेने यापूर्वी दिल्ली महानगरपालिकेसाठी दिल्ली मालबे' नावाचे अशाच प्रकारचे एकात्मिक पोर्टल यशस्वीरीत्या विकसित केले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# जल, वृक्ष आणि अर्थसमृद्धीकडे सिरसाळाची दमदार वाटचाल!

## लोकसहभागातून गाव बदलते, गाव बदलले की राष्ट्र समृद्ध होते -जलनायक मयंक गांधी

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या कार्यामुळे बीड जिल्हा जल, वृक्ष आणि अर्थसमृद्ध होईल - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन







**सिरसाळा (अतुल बडे)**

जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या 'जलवृक्ष समृद्धी अभियानाला' सिरसाळा येथे उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ग्लोबल विकास ट्रस्ट (GVT) आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून बीड जिल्ह्याला जल, वृक्ष आणि अर्थसमृद्ध बनविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, १०८ किलोमीटर नदी पुनरुज्जीवन आणि सिरसाळा येथील बुरुज व लेकुरवाळी या दोन तलावांचे खोलीकरण ही कामे मराठवाड्याच्या दुष्काळी भागासाठी आशेचा किरण आहेत. यामुळे भविष्यात पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात कमी होईल. पाणी हेच जीवन असून, कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक वाढते. लोकसहभागातून उभी राहिलेली ही चळवळ केवळ जलसंधारणापुरती मर्यादित नसून तंटामुक्ती, नशामुक्ती आणि सामाजिक एकोपा निर्माण करणारी परिवर्तनाची सुरुवात आहे. या कामांचे जतन करण्याची जबाबदारी नागरिकांनी स्वीकारावी, तसेच जिल्हा प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी जलनायक मयंक गांधी म्हणाले की, "ग्लोबल विकास ट्रस्टला या भागासाठी अजून खूप काही करायचे आहे. गावकऱ्यांचा जितका अधिक सहभाग मिळेल, तितक्या वेगाने विकासाची गती वाढेल. पुढील दोन वर्षांत केवळ सिरसाळाच नव्हे, तर संपूर्ण परिसराचा चेहरामोहरा बदलण्याचा आमचा संकल्प आहे. जलसंचय, स्वच्छता, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून हा परिसर जलवृक्ष समृद्ध बनविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे. एकोप्यातून समृद्धीची कास धरूया आणि राष्ट्राला सधन-संपन्न बनवूया." मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त भागात जलनायक मयंक गांधी यांच्या प्रेरणेतून सुरू असलेले हे कार्य अत्यंत प्रेरणादायी असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. जलसंधारण आणि शाश्वत शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनेकपटीने वाढ होऊन आर्थिक समृद्धीचा नवा मार्ग खुला झाल्याचे त्यांनी सांगितले.

अनुसया मंगल कार्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार विनोद रनवारे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले, डॉ. हरिश्चंद्र वँगे, डॉ. सदाशिव देशपांडे, सरपंच शेख नशीब यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी सरस्वती नदी पुनरुज्जीवन प्रकल्प तसेच पूर्णत्वास आलेल्या दोन्ही तलावांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रास्ताविकात सरपंच शेख नशीब यांनी सांगितले की, "एक काळ असा होता की सिरसाळ्यात येणाऱ्या प्रत्येकाला पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत होते. गेल्या पन्नास वर्षांपासून गावाने तीव्र दुष्काळ सहन केला. आम्ही जलनायक मयंक गांधी यांच्याकडे एका तलावाच्या खोलीकरणाची विनंती केली होती; मात्र GVT ने दोन तलावांचे काम पूर्ण करून गावाच्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय केला. आता गावात तीन लाख वृक्ष लागवड व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला असून, आगामी काळात सिरसाळा 'जलवृक्ष समृद्ध गाव' म्हणून राज्यात आदर्श निर्माण करेल."

उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनीही सिरसाळ्यातील जलसंधारण, वृक्षलागवड आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या लोकसहभागातून राबविल्या जाणाऱ्या विकासकामांचे विशेष कौतुक केले.

■ **शाश्वत विकासाचे नवे पर्व!**

जलसंधारण, वृक्षसंवर्धन आणि आर्थिक उन्नती या त्रिसूत्रीच्या बळावर सिरसाळा आता शाश्वत विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत असून, बीड जिल्ह्यासाठी हा उपक्रम आदर्श विकास मॉडेल ठरत असल्याची भावना संपूर्ण कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

# कौडगाव हुडा ते बोरखेड फाटा रस्त्याचे काम बोगस

## जे.के. कन्स्ट्रक्शन ने तात्काळ बोगस काम थांबवावे : संतप्त नागरिकांची मागणी नागरिक संतप्त,करणार अंदोलन



**सिरसाळा** : परळी तालुक्यातील कौडगाव हुडा फाटा ते बोरखेड फाटा हा ५ किमीच्या रस्त्याचे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून सिमेंट कॉंक्रेट चे काम होत आहे. सदरील काम अंत्यत निकृष्ट व बोगस केल्या जात आहे. या अंतर्गत असणारे नदी ओढ्यावरील पुलाची उभारणी पुर्ण ढिसाळ पद्धतीने झाली आहे. ह्याच पूलावरुन अतिवृष्टीत सन २०२५ मध्ये दोन ते तीन युवकांना आपला प्राण गमावावा लागला होता. असे गंभीर प्रकार या ठिकाणी होऊन देखील संबंधित कन्स्ट्रक्शन ने ढिसाळ नियोजनाचा पूल उभारला आहे. परिसरातील शेतींचे नुकसान होईल अशी रचना व उभारणी सदरील पुलांची आहे. हि गंभीर बाब या कामाचे संबंधित इंजिनिअरि यांना लक्ष्यात येणे आवश्यक होती परंतु त्यांनी देखील या कडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी पुलाचे व रस्त्याचे काम निकृष्ट झाले आहे. रस्त्यावर अंतरलेले सिमेंट मटेरियल तर पुर्ण उखरले गेले आहे. जिथे ड्राय मटेरियल टाकले आहे तिथे पाण्याचे वेळेत व्यावस्थापन केले नाही. रस्ता एक समान न करता , वेवस्थीत उखरुन त्याची दबई न करते कच्चे मटेरियल टाकले आहे. सदरील रस्ता पुर्णत निकृष्ट केल्या जात आहे. या मुळे रस्ता भागातील कौडगाव हुडा, तांडे,बोरखेड,ममदापुर,रामेवाडी ह्या भागातील नागरिकांत रोष पसरला असून संतप्त झाले आहेत. दिनांक १२ जुलै रोजी नागरिक थेट रस्त्यावर उतरले व बोगस कामाची पाहणी करून संबंधित इंजिनिअर यांच्या हि बाब निदर्शनास आणून दिली आहे. या वेळी दत्तात्रय गव्हाणे, नामदेराव वानखेडे,भगवानराजे कदम, बाबासाहेब गव्हाणे, विक्रम मिसाळ, नवनाथ वानखेडे, पंडितराव कदम,भागवत जाधव, बळिराम वानखेडे, दत्तात्रय कदम,दिलीप राठोड, पत्रकार मिलिंद चोपडे , गजानन कदम, जगन्नाथ कदम, कैलास खराडे, महेश कदम, जयराम कदम आदीसह अनेकजण उपस्थित होते. कामाचा दर्जा न सुधारल्यास तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

■ **लोकांमध्ये प्रचंड रोष :**

सोनपेठ - परळी- पोहनेर ह्या भागांना जोडणारा हा महत्वाचा रस्ता आहे. कौडगाव हुडा,काही तांडे, ममदापुर,बोरखेड,तेलसमुख,रामेवाडी

,पोहनेर,जळगव्हाण ह्या गावांचा ह्या रस्त्याशी रोजची रहदारी आहे. या भागात दळणवळण संबधी हा रस्ता महत्त्वाचा आहे. असे असतांना संबंधित गुत्तेदार बोगस काम करत आहेत या मुळे लोकांमध्ये प्रचंड रोष व संतापाचे वातावरण आहे. रस्ता कामात सुधारणा न झाल्यास येत्या आठ दिवसांत अंदोलन केले जाणार आहे.

# घाटनांदूर येथे 21 वर्षीय युवकाची निर्घृण हत्या; परिसरात खळबळ, आरोपींचे पोलिसांसमोर आव्हान



**बीड (अंबाजोगाई)** |अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथे काल शनिवारी (११ जुलै) मध्यरात्री किरकोळ वादातून एका २१ वर्षीय तरूणाचा तीक्ष्ण हत्याराने वार करून निर्घृण खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ज्ञानेश्वर उत्तरेश्वर वाकडे (वय २१, रा. पट्टीवडगाव) असे मृत युवकाचे नाव असून, या हल्ल्यात त्याचा एक मित्र गंभीर जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर वाकडे हा लातूर येथील एका हायवेवर आचारी म्हणून काम करत होता. शनिवारी रात्री ११:३० वाजताच्या सुमारास ज्ञानेश्वर त्याच्या दोन मित्रांसह मोटारसायकलवरून अंबाजोगाईहून घाटनांदूरकडे जात होता. घाटनांदूर येथील साठे चौकात आले असता, काही जणांसोबत त्यांचा वाद झाला. या वादातून संशयित आरोपींनी ज्ञानेश्वरवर चाकूने सपासप वार केले. हा हल्ला इतका भीषण होता की ज्ञानेश्वरचा जागीच मृत्यू झाला. यावेळी मोटारसायकलवरील एका मित्राने पळ काढल्याने तो सुदैवाने बचावला, तर दुसरा मित्र गंभीर जखमी झाला आहे. जखमी मित्रावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात धाव घेतली असून, तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

# सासवडच्या वाघीरे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश







**सासवड (प्रतिनिधी) :**

दरवर्षी आळंदीपासून पंढरपूरला जाणाऱ्या आषाढी वारीतील ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे स्वागत करण्यासाठी दरवर्षी विद्यालय विद्यार्थी दिंडीचे आयोजन करते.

या वर्षी सासवड येथे पालखीचे आगमन शनिवार दि ११ जुलै २०२६ रोजी झाले. विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, उपमुख्याध्यापक शंतनू सुरवसे,पर्यवेक्षिका अर्चना लडकत यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्वर पालखीच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या विद्यार्थी दिंडी सोहळ्यात शाळेतील सुमारे ८० विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सहभाग घेतला.

वारकरी वेष धारण करून, टाळांच्या तालावर संतांचे अभंग गात गात या दिंडीमध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते. काही विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर , निवृत्तिनाथ, मुक्ताई ,आणि सोपानदेव, संत तुकाराम या संतांची वेशभूषाही केली होती. ही विद्यार्थी दिंडी प्रशालेतून निघाली आणि पुणे-सासवड या पालखी महामार्गावरून सासवडकडे येणाऱ्या ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीला स्वागतासाठी सामोरी गेली.

या प्रसंगी विद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी अनुप्रिया पाडळकर हिने साक्षरता आणि सार्वजनिक स्वच्छता या विषयांवर वारकऱ्यांचे प्रबोधन करण्याकरता लिहिलेल्या पथनाट्याचे सादरीकरण इयत्ता आठवी तक्षशिला आणि नालंदा या वर्गातील अनुप्रिया पाडळकर, संस्कृती जगताप. गार्गी नाचण, कार्तिकी ठाकरे, स्वराली शिवरकर आणि जान्हवी शेंडकर या विद्यार्थिनींनी केले. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांना या विद्यार्थी दिंडीतून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या विद्यार्थिनींना विद्यालयाच्या मराठी विषयाच्या शिक्षिका संगीता रिकामे आणि शिक्षक सूर्यकांत खैरनार यांनी मार्गदर्शन केले होते. विद्यार्थी दिंडीत सहभागी झालेल्या विद्यालयातील शिक्षकांनी देखील विद्यार्थ्यांसोबत वारकरी नृत्य केले. विद्यार्थी दिंडीचे नियोजन विद्यालयातील शिक्षक शिवहार लहाने, हिरामण सहारे , शंकर विभाड इत्यादी शिक्षकांनी केले होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार, 13 जुलै 2026
Last page






# परळी वैजनाथ शहरात 14 जुलै रोजी भव्य रिंगण सोहळ्याचे आयोजन

## सर्व वारकरी-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचे आवाहन




परळी वैजनाथ : प्रतिनिधी

आषाढी वारीनिमित्त परळी वैजनाथ शहरात मंगळवार, दि. १४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ३.३० वाजता भव्य रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या पालखीतील सर्व वारकरी तसेच वारकरी महिला भजनी मंडळांच्या सहभागातून हा सोहळा उत्साहात पार पडणार आहे.सर्व वारकरी-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे  असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

अखिल भारतीय वारकरी मंडळ व परळी नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमात शहर व तालुक्यातील सर्व महिला भजनी मंडळे सहभागी होणार आहेत. वारकरी संप्रदायाची परंपरा, हरिनामाचा गजर आणि भक्तिमय वातावरण यामुळे परळी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. रिंगण सोहळा कॉटन मार्केट यार्ड (जत्रा मैदान),  वेअरहाऊस शेजारी, परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आला आहे.  या सोहळ्याच्या निमित्ताने नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी सर्व वारकरी, भाविक, महिला भजनी मंडळे तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे.

# आष्टी नगरपंचायत प्रभाग क्र. 1 मध्ये SIR Mapping नोंदणीसाठी भव्य शिबिर

## संपत सायकड यांच्या पुढाकारातून संपन्न झाले शिबिर

आष्टी | प्रतिनिधी



आष्टी नगरपंचायत प्रभाग क्रमांक १ अंतर्गत संजय नगर येथे संपत भैय्या सायकड यांच्या पुढाकारातून SIR Mapping (एसआयआर मॅपिंग) नोंदणीसाठी भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळपासूनच महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध घटकांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली SIR नोंदणी करून घेतली.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संपत भैय्या सायकड, नगरसेवक श्याम दादा वाल्हेकर, सिद्धार्थ योगे तसेच इतर सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती, अर्ज भरण्यास मदत, ऑनलाइन नोंदणी आणि इतर सर्व प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आली.

ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग नागरिकांसाठी स्वतंत्र मदत व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे नागरिकांची नोंदणी जलद आणि सुरळीत पार पडली. उपस्थित नागरिकांनी शिबिराच्या उत्कृष्ट नियोजनाचे आणि कार्यकर्त्यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

SIR Mapping नोंदणी ही शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महत्त्वाची प्रक्रिया असल्याने या शिबिरामुळे अनेक नागरिकांची मोठी सोय झाली. नागरिकांना त्यांच्या परिसरातच नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देत शासनाच्या उपक्रमात अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढविण्याचा उद्देश या शिबिरामागे असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या उपक्रमामुळे प्रभाग क्रमांक १ मधील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून संपत भैय्या साईकड यांच्या पुढाकाराचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच नगरसेवक श्याम दादा वाल्हेकर, सिद्धार्थ योगे आणि सर्व सहकाऱ्यांच्या परिश्रमामुळे हे शिबिर यशस्वी ठरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. भविष्यातही अशा लोकाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली.

# चार्जशीटमधून नावे गायब करण्याचा कट? राजस्थानी मल्टी स्टेट प्रकरणात खळबळ

## राजस्थानी मल्टी स्टेट संचालक विजय लड्डा आणि अशोक जाजू यांच्याविरोधात ठेवीदारांचा गंभीर दावा

परळी / प्रतिनिधी

राजस्थानी मल्टीस्टेट पतसंस्थेतील हजारो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकलेले असताना, काही संचालक मात्र बनावट व खोट्या राजीनामा पत्रांच्या आधारे विविध जिल्ह्यांतील दोषारोपपत्रातून स्वतःची नावे वगळून घेण्यात व्यस्त असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकारामुळे ठेवीदारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, "संचालक स्वतःची सुटका करण्यात यशस्वी होत असतील तर ठेवीदारांना न्याय कोण देणार?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि ढाणखी येथील गुन्ह्यांमध्ये कथितपणे खोटे दस्तऐवज सादर करून आर्थिक गुन्हे शाखेकडून पुरवणी दोषारोपपत्रातून नावे वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. यानंतर लातूर, धाराशिव, पंढरपूर, बीड आणि परभणी येथील प्रकरणांमध्येही अशाच प्रकारच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांतील दोषारोपपत्रांतूनही नावे वगळण्यात यश आल्याचा दावा करण्यात येत आहे.

ठेवीदारांच्या मते, जर संचालक मंडळातील व्यक्ती स्वतःची नावे दोषारोपपत्रांतून वगळण्यात यशस्वी होत असतील, तर हजारो ठेवीदारांना न्याय कसा मिळणार, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित संचालकांकडून जुन्या राजीनाम्यांच्या प्रती दाखवून प्रशासनाची दिशाभूल केली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

राजस्थानी मल्टी स्टेटच्या घोटाळ्यात आधीच हजारो कुटुंबे आर्थिक संकटात सापडलेली असताना, आता बनावट राजीनामे, दोषारोपपत्रातून नावे वगळणे आणि गायब झालेल्या मालमत्तेच्या आरोपांनी या प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळाले आहे.

■ **-राजीनाम्याचा दावा आणि 2023 मधील अर्जामुळे प्रश्न**

विजय लड्डा यांनी 2017 मध्ये राजीनामा दिल्याचा दावा केला असला, तरी 2023 मध्ये एका कर्जदाराच्या सुमारे एक कोटी रुपयांच्या व्याजात सवलत देण्याबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कुलकर्णी यांना संचालक म्हणून अर्ज केल्याचा दावा ठेवीदारांनी केला आहे. त्या अर्जावर संचालक म्हणून सहमती दर्शविण्यात आल्याचे पत्र त्यांनी दिले असल्याचा दावाही करण्यात आला आहे.याशिवाय, संस्थेच्या विविध कार्यक्रम, शाखा उद्घाटने, स्थलांतर आणि इतर अधिकृत उपक्रमांच्या प्रसिद्ध झालेल्या पत्रिका व वृत्तांमध्ये संबंधित संचालकांची नावे सातत्याने प्रकाशित केली गेली असल्याचे सांगण्यात येत आहे. संस्थेच्या वार्षिक लेखापरीक्षण (ऑडिट) अहवालांमध्येही संबंधित संचालकाचे नाव असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

■ **-60 लाखांचे फर्निचर नेमके कुठे गेले?**

ठेवीदारांनी आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. संचालक अशोक जाजू यांच्या मालकीच्या जागेत राजस्थानी मल्टीस्टेटची मुख्य शाखा स्थलांतरित करण्यात आली होती. त्या ठिकाणी सुमारे 60 लाख रुपये खर्चून एसी, फर्निचर, टेबल, खुर्च्या, जनरेटर आणि इनव्हर्टर आदी साहित्य बसविण्यात आल्याचा दावा आहे.संस्था बंद झाल्यानंतर हे साहित्य गायब झाल्याचे सांगितले जात असून, याबाबत प्रशासकांकडे विचारणा केली असता घरमालकांकडून चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.हे साहित्य नेमके कुठे गेले? ते विकण्यात आले असल्यास त्यासाठी न्यायालय, लिक्विडेटर किंवा आर्थिक गुन्हे शाखेची परवानगी होती का? याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी ठेवीदारांकडून करण्यात येत आहे.

# परळीत मंगळवारी भव्य रिंगण सोहळा; भाविकांनी उपस्थित राहावे - ह.भ.प. कोकाटे महाराज



परळी | वार्ताहर

अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ व परळी नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. 14 जुलै 2026 रोजी दुपारी 3:00 वाजता मार्केट यार्ड नाथ रोड परळी येथे श्री संत नामदेव महाराज पालखीचा भव्य दिव्य रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा रिंगण सोहळा मार्केट यार्ड, नाथ रोड येथील यात्रा मैदानावर दुपारी 3:00 वाजता सुरू होणार आहे.

■ **6 व्या वर्षी रिंगण, भक्तिमय वातावरण**

रिंगण सोहळ्याचे आयोजक ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे म्हणाले, "हा रिंगण सोहळा आता सलग 6 व्या वर्षी परळीत होत आहे. त्यामुळे परळी परिसरात आधीपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. वारकरी भजनी मंडळींचा टाळ-मृदुंगाचा गजर आणि अश्व रिंगणामुळे डोळ्याचे पारणे फेडणारा हा सोहळा असेल."

■ **भाविकांनी कुटुंबासह सहभागी व्हावे**

ते पुढे म्हणाले, "हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत हा रिंगण सोहळा होणार आहे. परळीतील भाविकांनीही घरी न थांबता कुटुंबासह रिंगणात सहभागी होऊन आनंद घ्यावा. तसेच श्री संत नामदेव महाराजांच्या पालखीचे दर्शन घ्यावे," असे आवाहन त्यांनी केले.

■ **माऊली सेवारत्न पुरस्कार वितरण**

या रिंगण सोहळ्यात संत माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या 26 व्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी दिला जाणारा "माऊली सेवारत्न पुरस्कार 2026" मान्यवरांच्या आणि हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

यंदा हा पुरस्कार मा. श्री. प्रदीप डिवाजीराव खाडे, अध्यक्ष - कै. रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्था, लातूर व सहसचिव - नाथ शिक्षण संस्था, परळी वै. यांना प्रदान करण्यात येणार आहे.

रिंगण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ व नगरपरिषदेच्या वतीने सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.